


दैनिक

# आकर्षण

संपादक : विजय सांगळे




वर्ष ६ । अंक ३३ । शनिवार २४ ऑक्टोबर २०२६ । पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# जिल्ह्याच्या मातीतले रांगडे नेतृत्व हरपले, ज्येष्ठ नेते भानुदास कोतकर यांचे निधन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– जिल्ह्याच्या राजकीय, सहकार आणि कृषी क्षेत्रात आपल्या कामाचा वेगळा ठसा उमटवणारे ज्येष्ठ काँग्रेस नेते आणि संदीप उद्योग समूहाचे संस्थापक भानुदास एकनाथ कोतकर यांचे आज, शनिवारी सकाळी ११ वाजेच्या सुमारास निधन झाले. ते ७४ वर्षांचे होते. हृदयविकाराचा त्रास जाणवू लागल्याने त्यांना येथील आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले माजी महापौर संदीप कोतकर, उद्योजक सचिन कोतकर, अमोल कोतकर, एक मुलगी माजी जि. प. सदस्या सुवर्णा जगताप, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. माजी आमदार दिवंगत शिवाजीराव कर्डिले आणि माजी आमदार दिवंगत अरुणकाका जगताप हे त्यांचे व्याही होत.जिल्ह्याच्या मातीतले रांगडे नेतृत्व म्हणून परिचित असलेले भानुदास कोतकर यांनी त्यांच्या राजकीय प्रवासात अनेक महत्त्वाची पदे भूषवली. त्यात नगर पंचायत समितीचे सभापती, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक, नगर तालुका काँग्रेस आणि जिल्हा शहर काँग्रेसचे अध्यक्षयासोबतच त्यांनी संदीप उद्योग समूहाची स्थापना करून उद्योग क्षेत्रातही मोठे योगदान दिले. भानुदास कोतकर यांच्या निधनाने जिल्ह्याच्या राजकीय, सामाजिक आणि कृषी क्षेत्रातील एका धडाडीच्या पर्वाचा अंत झाला असून, त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. केडगावकरांशी विशेष जिव्हाळ्याचे नाते राहिलेल्या भानाभाऊंना केडगावकरांनी सर्व व्यवहार बंद ठेवून श्रद्धांजली अर्पण केली.

## पिठाची गिरणी ते सरपंचपद, राजकीय जीवनाचा रचला पाया

सुरुवातीच्या काळात पिठाची गिरणी चालवणाऱ्या भानुदास कोतकर यांनी केडगाव ग्रामपंचायतीची निवडणूक लढवून सरपंचपद मिळवले. येथूनच त्यांच्या राजकीय जीवनाचा पाया रचला गेला. दिवंगत माजी खासदार दादा पाटील शेळके यांचे पाठबळ मिळाल्याने त्यांनी जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत चास गटातून मोठे यश मिळवले व ग्रामीण राजकारणात आपली पकड घट्ट केली.नगर तालुका पंचायत समितीचे सभापती, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती आणि मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक म्हणून त्यांनी जबाबदाऱ्या अत्यंत ताकदीने सांभाळल्या.

## महापालिकेतील किंगमेकर

महापालिकेतील सत्तास्थापनेत आणि बहुमताची जुळवाजुळव करण्यात, विशेषतः कर्डिले-जगताप-कोतकर या त्रिकुटाच्या माध्यमातून, भानुदास कोतकर यांनी अनेक वर्षे किंगमेकरची भूमिका बजावली. मध्यंतरी कुटुंब कायद्याच्या कचाट्यात सापडलेले असताना कुटुंबातील राजकीय वारसा पुढे नेत त्यांच्या स्नुषा सुवर्णा कोतकर यांनीही महापालिकेत उपमहापौरपदाची धुरा यशस्वीपणे सांभाळली.

## राजकीय प्रभावाची निष्पत्ती, महापौरपदावर सुपुत्राची मोहोर

महापालिका राजकारणात कोतकर पॅटर्नचा नेहमीच प्रभाव राहिला. याच प्रभावातून सन २००६ मध्ये भानुदास कोतकर यांचे पुत्र संदीप कोतकर यांनी महापालिका निवडणुकीत मोठे यश मिळवले व ते काँग्रेसकडून अहिल्यानगरचे महापौर झाले, ज्यामुळे शहराच्या सत्ताकारणावर कोतकरांचे थेट नियंत्रण प्रस्थापित झाले. महापालिकेच्या राजकारणात कोतकरांचा शब्द कायमच प्रमाण राहिला.

## भानाभाऊंची बातच न्यारी...

एक रांगडे व धडाडीचे व्यक्तिमत्त्व म्हणून भानुदास कोतकर यांना ओळखले जायचे. राजकारणातही त्यांनी आपल्या याच स्वभावाच्या जोरावर आपले वेगळे स्थान निर्माण केले होते. केडगाव हे कोतकरांचे होमग्राऊंड. त्यामुळे नगर शहराच्या राजकीय उलाढालीत केडगाव हे महत्त्वाचे केंद्र म्हणून उदयास आले. केडगावकरांसाठी भक्कम आधारवड असलेले भानाभाऊ कोणाच्याही सुख–दुःखात कायम मदतीला धावून जात. तडकाफडकी लोकांची कामे मार्गी लावणे ही त्यांची खासीयत राहिली. यामुळेच अल्पावधीतच त्यांची लोकप्रियता वाढून केडगावकरांसाठी ते हक्काचा माणूस ठरले. याच बळावर त्यांचा राजकीय पाया विस्तारत गेला. नगर शहर व जिल्ह्याच्या राजकीय पटलावरही त्यांचे नाव पुढे येऊ लागले. हे करत असताना त्यांनी सर्वसामान्य केडगावकरांशी असलेली नाळ कधीच तुटू दिली नाही. प्रसंगी आक्रमक होऊन ते सर्वसामान्य, शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवित असत. त्यामुळे भानाभाऊंची बातच न्यारी होती. संदीप उद्योग समूहाच्या माध्यमातून त्यांनी व्यावसायिक क्षेत्रातही दमदार पाऊल टाकले व यशस्वी वाटचाल केली. त्यामुळेच कोतकर कुटुंबीयाचे व्यवसाय क्षेत्रात अग्रेसर असून, नगरसह पुणे शहरातही त्यांनी विशेष करून हॉटेल व्यवसायात चांगले नाव कमावलेले आहे. शेवटपर्यंत त्यांचे सर्वसामान्य जनतेशी असलेले नाते कायम राहिले. याच बळावर राजकीय, सामाजिक व व्यावसायिक क्षेत्रात कोतकर कुटुंबीयांचा दबदबा कायम राहिलेला आहे.

## लोकसंग्रहाच्या हातोटीतून विस्तारला राजकीय पाया

लोकसंग्रहाची हातोटी असलेले भानुदास कोतकर राजकीय डावपेचात कुशल होते. याच बळावर त्यांचा राजकीय पाया विस्तारत गेला. केडगावमध्ये भानाभाऊ म्हणून परिचित असलेले हे रांगडे नेतृत्व नगर शहर व जिल्ह्याच्या राजकीय पटलावरही चमकू लागले. त्यांच्या राजकीय प्रभावाच्या काळात त्यांच्या पत्नी सुरेखा कोतकर यांनी जिल्हा बँकेच्या संचालकपदाची जबाबदारी सांभाळली. बदलती राजकीय समीकरणे ओळखून भानुदास कोतकर पंचायत समितीपासून ते अहिल्यानगर शहर व तालुका काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदापर्यंत यशस्वी वाटचाल केली. या वाटचालीत त्यांची जिल्हा व राज्यपातळीवरील अनेक ज्येष्ठ नेत्यांशी जवळीक वाढली.

## शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी पुढाकार, कृषी बाजारपेठेतील भरीव योगदान

भानुदास कोतकर यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न विशेष जिव्हाळ्याने सोडविण्यासाठी नेहमीच पुढाकार घेतला. शेतकऱ्यांना शेतमाल विक्रीसाठी उत्तम सुविधा मिळाव्यात यासाठी नेप्ती उपबाजार समिती आणि चिचोंडी पाटील उपबाजार समितीच्या उभारणीत त्यांनी घेतलेला पुढाकार लक्षवेधी ठरला.

## कर्डिले-जगताप-कोतकर त्रिकुटाचे शहरावर अधिराज्य

माजी आमदार दिवंगत शिवाजीराव कर्डिले आणि दिवंगत अरुणकाका जगताप यांच्याशी त्यांचे घनिष्ठ व कौटुंबिक संबंध व नाते निर्माण झाले होते. या तिन्ही नेत्यांनी मिळून अनेक वर्षे जिल्ह्याच्या सत्ताकारणावर अधिराज्य गाजवले. जिल्हा गाजवणाऱ्या या तिन्ही लोकप्रिय नेत्यांचा थोड्याच कालावधीत अस्त झाल्याने नगर शहराच्या राजकारणात पोकळी निर्माण झाली आहे.

## केडगाव पॅटर्नची निर्मिती

महापालिकेच्या राजकारणात केडगावला एक स्वतंत्र आणि भक्कम राजकीय केंद्र बनवण्यात कोतकरांचा मोठा वाटा होता. एकाच प्रभागातून कुटुंबातील अनेक सदस्यांना निवडून आणण्याच्या त्यांच्या व्यूहरचनेला राजकीय वर्तुळात केडगाव पॅटर्न म्हटले जाऊ लागले.

## संक्षिप्त राजकीय कारकिर्द

- भानुदास कोतकर यांच्या राजकीय कारकिर्दीचा श्रीगणेशा ग्रामपंचायतीपासून झाला. पिठाची गिरणी चालवताना केडगाव ग्रामपंचायतीची निवडणूक लढवली आणि सरपंचपद मिळवून त्यांनी राजकीय कारकिर्दीची सुरुवात केली. भानाभाऊ म्हणजे केडगावकरांच्या सुख-दुःखाला धावून येणारा आपला माणूस हे समीकरण तयार झाले व याच बळावर त्यांची कारकीर्द बहरू लागली.
- १९९० च्या दशकात जिल्हा परिषदेत चास गटातून विजय, त्यानंतर नगर तालुका पंचायत समितीचे सभापतीपद भूषवले.
- १९९५-२००५ या कालावधीतअहिल्यानगर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक आणि नगर तालुका/शहर काँग्रेसचे अध्यक्षपद. नेप्ती उपबाजार समितीची उभारणी.
- सन २००६ मध्ये पुत्र संदीप कोतकर यांची अहिल्यानगर महानगरपालिकेच्या महापौरपदी निवड; शहरी राजकारणात कोतकरांचे थेट वर्चस्व प्रस्थापित.
- सन २००८-२०११ या कालावधीत कोतकर यांच्यामागे कायद्याचा ससेमिरा लागला. त्यांच्या राजकीय कारकिर्दीला सर्वात मोठा धक्का अशोक लांडे खून प्रकरणामुळे बसला. या प्रकरणात त्यांना जन्मठेपेची शिक्षा आणि जिल्हाबंदीच्या कारवाईला सामोरे जावे लागले, ज्यामुळे त्यांचे राजकीय वर्चस्व न्यायालयीन लढाईत अडकले. तरीही नगर शहराच्या राजकारणात त्यांचास्वतंत्र गट कायमच प्रभावीपणे कार्यरत राहिला.

## केडगावचा महापालिकेत समावेश आणि कोतकरांची जोरदार एन्ट्री

केडगाव ग्रामपंचायतीचा अहिल्यानगर महापालिकेत समावेश झाल्यानंतर, भानुदास कोतकर यांनी आपले लक्ष ग्रामीण भागातून थेट शहराच्या राजकारणाकडे वळवले आणि शहरात आपले बस्तान बसवले. काँग्रेसचे नेते असूनही महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत भाजपच्या व्यासपीठावर लावलेली हजेरी त्यांच्या राजकीय लवचिकतेचे मोठे उदाहरण होते.

## दै. आकर्षण निवडक

### अहिल्यानगरची सुमय्या शेख ठरली वर्षातील सर्वोत्तम खेळाडू

अहिल्यानगर - येथील प्रतिभावान महिला



फुटबॉलपटू सुमय्या शेख हिने आपल्या दमदार कामगिरीच्या जोरावर वेस्टर्न इंडिया फुटबॉल संघटनेच्या वतीने दिला जाणारा २०२५-२६ हंगामातील वरिष्ठ महिला गटाचा 'वर्षातील सर्वोत्तम खेळाडू' पुरस्कार पटकावला आहे. मुंबई येथे झालेल्या पुरस्कार सोहळ्यात तिच्या या उल्लेखनीय कामगिरीचा गौरव करण्यात आला. सुमय्याने संपूर्ण हंगामात राज्यस्तरीय, राष्ट्रीय तसेच आंतरविद्यापीठीय स्पर्धांमध्ये सातत्यपूर्ण आणि प्रभावी कामगिरी केली. तिच्या खेळातील कौशल्य, गोल करण्याची क्षमता आणि संघाच्या यशात दिलेले योगदान यांची दखल घेत तिला या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. २०२५-२६ च्या हंगामात सुमय्याने लोणावळा येथे झालेल्या महाराष्ट्र वरिष्ठ क्लब राज्य लीग स्पर्धेत विजेतेपद मिळविणाऱ्या क्रीडा प्रबोधिनी संघाचे प्रतिनिधित्व केले. केरळ येथे झालेल्या इंडियन वुमेन्स लीग () २ स्पर्धेत तसेच बंगळुरू येथे झालेल्या २ अंतिम फेरीतही तिने सहभाग नोंदविला. जळगाव येथे झालेल्या आंतरजिल्हा स्पर्धेत अहिल्यानगर संघाने तृतीय स्थान मिळविले, तर सुमय्याने या स्पर्धेत सर्वाधिक गोल करून स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरण्याचा मान मिळविला. आंतरविद्यापीठीय फुटबॉल स्पर्धांमध्येही तिने आपल्या कामगिरीची छाप पाडली. मध्य प्रदेश येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत विजेतेपद मिळविणाऱ्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघात तिचा महत्त्वपूर्ण सहभाग होता. त्यानंतर तामिळनाडू येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघाने उपविजेतेपद पटकावले. पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेतही सुमय्या सर्वाधिक गोल करणारी खेळाडू ठरली. राज्यस्तरीय लीगपासून ते राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांपर्यंत सातत्यपूर्ण कामगिरी, दोन महत्त्वाच्या स्पर्धांमधील सर्वोच्च गोलसंख्येचा बहुमान आणि संघाच्या यशात दिलेले योगदान या कामगिरीमुळे सुमय्याने वरिष्ठ महिला फुटबॉलमध्ये आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. क्रीडा प्रबोधिनी पुणे संघात समावेश होण्यापूर्वी सुमय्या हिचे प्रशिक्षण गुलमोहर फुटबॉल क्लब अहिल्यानगर येथे झाले असून, तिच्या यशामध्ये गुलमोहर फुटबॉल क्लब चे मोठे योगदान आहे.वेस्टर्न इंडिया फुटबॉल संघटनेकडून मिळालेला हा पुरस्कार तिच्या मेहनतीची पावती आहे. सुमय्याच्या या यशामुळे अहिल्यानगरच्या क्रीडा क्षेत्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. तिच्या यशाने जिल्ह्यातील उदयोन्मुख महिला फुटबॉलपटूंना निश्चितच प्रेरणा मिळेल असे मनोगत अहिल्यानगर जिल्हा फुटबॉल संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी व्यक्त केले आहे. तसेच वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर, खालिद सय्यद, अमरजित सिंग शाही, सचिव रोनप फर्नांडिस, सहसचिव व्हिक्टर जोसेफ, प्रदीप जाधव, खजिनदार रिशपालसिंग परमार, सहखजिनदार रणबीरसिंग परमार, सदस्य राजू पाटोळे, गुलमोहर फुटबॉल क्लबचे अध्यक्ष जोहेब खान यांनी सुमैय्या शेख हिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# शहरातील कापड व्यापारी संघाचा स्नेहमेळावा उत्साहात

**संजय चोपडा यांचा चेअरमनपदी निवड झाल्याबद्दल सत्कार । स्नेह, एकोपा आणि व्यापारी बांधिलकीचा संगम; मनोरंजनात्मक खेळ व स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** परस्परांतील स्नेह, एकोपा आणि व्यापारी बांधिलकी अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने अहमदनगर ठोक कापड व्यापारी संघ, अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला कोजागिरी पौर्णिमा स्नेहमेळावा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. आनंदधाम रोड येथील हॉटेल परंपरा येथे झालेल्या या कार्यक्रमात संघाचे सभासद मोठ्या संख्येने सहभागी झाले. मनोरंजनात्मक खेळ, विविध स्पर्धा आणि गुणगौरव अशा उपक्रमांनी या स्नेहमेळाव्याला विशेष रंगत आली.

या स्नेहमेळाव्याच्या निमित्ताने व्यापारी बांधवांना एकत्र येत परस्परांशी संवाद साधण्याची, विचारांची देवाणघेवाण करण्याची आणि आपुलकीचे संबंध अधिक दृढ करण्याची संधी मिळाली. कोजागिरी पौर्णिमेचा आनंद लुटत उपस्थितांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला. संघटनेतील एकात्मता आणि सामूहिक सहभागाचे दर्शन या कार्यक्रमातून घडले. अहमदनगर मर्चंट्स को-ऑपरेटिव्ह बँकेच्या चेअरमनपदी ठोक कापड व्यापारी संघाचे सदस्य संजय चोपडा यांची निवड झाल्याबद्दल संघाच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. या निवडीबद्दल उपस्थित पदाधिकारी आणि सभासदांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी अहिल्यानगर ठोक कापड व्यापारी संघाचे उपाध्यक्ष सचिन चोपडा यांनी मनोगत व्यक्त करताना व्यापारी समाजात परस्पर विश्वास, स्नेह आणि एकोपा जपण्याची गरज अधोरेखित केली. ते म्हणाले की, अशा स्नेहमेळाव्यांमुळे सभासदांमधील आपुलकी वाढते, विचारांची देवाणघेवाण होते आणि संघटना अधिक मजबूत बनते. व्यापाऱ्यांचे हित जपतानाच सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी संघटना नेहमीच कटिबद्ध राहील. भविष्यातही सर्व सभासदांच्या सहकार्याने विधायक आणि सामाजिक उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले.

उपस्थित मान्यवरांनीही व्यापारी समाजात एकात्मता, परस्पर सहकार्य आणि सामाजिक सलोखा टिकवून ठेवण्याचे महत्त्व स्पष्ट केले. व्यापारी संघटना केवळ व्यावसायिक हितापुरती मर्यादित न राहता सभासदांमधील मैत्रीपूर्ण संबंध आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचे कार्यही करते. अशा उपक्रमांमुळे संघटनेतील परस्पर विश्वास वाढून संघटना अधिक सक्षम होते, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

कोजागिरी पौर्णिमेनिमित्त आयोजित या स्नेहमेळाव्यात विविध मनोरंजनात्मक उपक्रम, खेळ आणि स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. सभासदांनी या उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विजेत्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आकर्षक बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. या उपक्रमांमुळे कार्यक्रमात आनंद, उत्साह आणि चैतन्यपूर्ण वातावरण निर्माण झाले.

या कार्यक्रमाला संघाचे अध्यक्ष शामसुंदर सारडा, मुकेश अरोरा, सचिन कटारिया, सचिन चोपडा, सचिन पेटकर, कपिल शहा, अजय गांधी, इंद्रकुमार मुथा, विजय गुगळे, विशाल शेठिया, सुशील फिरोदिया, दिलीप चोपडा, ओमप्रकाश इटारा, सचिन पितळे, रजनीकांत गांधी, जितेंद्र लड्डा यांच्यासह संघाचे पदाधिकारी आणि सभासद उपस्थित होते.

# आयएमएस संस्थेच्या एमबीए विद्यार्थ्यांची इंडियन ऑइल प्रकल्पाला औद्योगिक भेट



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बीपीएचई सोसायटीच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, करिअर डेव्हलपमेंट अँड रिसर्च येथील एमबीए द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी फायनान्स क्लबच्या वतीने १३ ऑक्टोबर २०२६ रोजी अकोळनेर येथील इंडियन ऑइल प्रकल्पाला औद्योगिक भेट आयोजित करण्यात आली होती. या भेटीत एकूण ३८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांना औद्योगिक कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा, तसेच वर्गातील सैद्धांतिक ज्ञानाचा प्रत्यक्ष औद्योगिक कार्यपद्धतीशी संबंध जोडता यावा, हा या भेटीचा मुख्य उद्देश होता. या भेटीदरम्यान इंडियन ऑइलच्या अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करून प्रकल्पाची रचना, कामकाज आणि विविध कार्यप्रक्रियांची माहिती दिली. विद्यार्थ्यांना औद्योगिक वातावरण, कामाच्या ठिकाणची शिस्त, सुरक्षिततेचे नियम, विविध विभागांमधील समन्वय आणि मोठ्या संस्थेतील व्यवस्थापन पद्धती यांविषयी प्रत्यक्ष माहिती मिळाली. तसेच, उद्योगातील व्यावसायिक शिस्त, सांघिक कार्य आणि प्रभावी व्यवस्थापनाचे महत्त्वही विद्यार्थ्यांना समजले.

या औद्योगिक भेटीचे समन्वयन प्रा. पूनम तिवारी यांनी केले. त्यांच्यासमवेत प्रा. साक्षी मध्यान आणि डॉ. राहुल खंडेलवाल उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन करून प्रकल्पाच्या कामकाजाची माहिती दिल्याबद्दल श्री. अक्षय ओसवाल आणि सुश्री शिखा शर्मा यांचे विशेष आभार मानण्यात आले. इंडियन ऑइलच्या संपूर्ण टीमने केलेले स्वागत, आदरातिथ्य आणि उत्तम नियोजन यांमुळे ही भेट विद्यार्थ्यांसाठी माहितीपूर्ण, आनंददायी आणि संस्मरणीय ठरली.

या औद्योगिक भेटीमुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योगातील कार्यपद्धती समजून घेण्याची संधी मिळाली. तसेच, शैक्षणिक ज्ञान आणि औद्योगिक व्यवहार यांची सांगड घालण्यास मदत झाली. विद्यार्थ्यांच्या व्यावहारिक ज्ञानात भर घालणारा आणि व्यवस्थापन कौशल्यांची जाणीव करून देणारा हा उपक्रम यशस्वी ठरला.

# 'जिल्हा बँक ही शेतकरी, कर्मचारी व कामगारांची कामधेनू' - आमदार अक्षय कर्डिले

**। आमदार अक्षय कर्डिले यांचा मनपा कर्मचारी सहकारी पतसंस्थेतर्फे सत्कार**
**। जिल्हा सहकारी बँकेच्या संचालकपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल गौरव**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या संचालकपदी आमदार अक्षय कर्डिले यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पतसंस्थेचे चेअरमन बाबासाहेब मुदगल, व्हाईस चेअरमन कैलास चावरे, ज्येष्ठ संचालक जितेंद्र सारसर, संचालक सतीश ताठे, शेखर देशपांडे, किशोर कानडे, विकास गीते, अजय कांबळे, विजय कोतकर आदींसह संचालक मंडळ उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना आमदार अक्षय कर्डिले म्हणाले की, जिल्हा सहकारी बँक ही शेतकरी, कर्मचारी आणि कामगारांची कामधेनू आहे. जिल्हा बँकेच्या माध्यमातून विविध सहकारी संस्थांना आर्थिक पाठबळ दिले जाते. अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेला जिल्हा बँकेच्या माध्यमातून भविष्यात कोणत्याही प्रकारची मदत आवश्यक असल्यास सहकार्य करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

पतसंस्थेचे चेअरमन बाबासाहेब मुदगल म्हणाले की, स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी नेहमीच जिल्हा बँकेच्या माध्यमातून अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेला मदत केली. अडचणीच्या काळात धावून येणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख होती. त्यांनी केलेले कार्य आमदार अक्षय कर्डिले पुढे घेऊन जातील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

जिल्हा सहकारी बँकेच्या संचालकपदी आमदार अक्षय कर्डिले यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल पतसंस्थेच्या वतीने त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाच्या शेवटी व्हाईस चेअरमन कैलास चावरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# शालेय स्वच्छता हा संस्कार; तो रोजच जपला पाहिजे – विजय बेरड

**ॲबट संकुलात स्वच्छता अभियान । तीन एकरांचा शालेय परिसर शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी केला चकाचक!**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शाळा ही विद्यार्थ्यांच्या जडणघडणीचे महत्त्वाचे केंद्र असून, विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची सवय रुजविणे ही काळाची गरज आहे. घराप्रमाणेच शाळा, रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणेही स्वच्छ ठेवली पाहिजेत. स्वच्छता हा केवळ एक दिवसाचा उपक्रम नसून तो आपल्या दैनंदिन जीवनाचा आणि संस्कारांचा भाग बनला पाहिजे. त्यामुळे भिंगार येथील ॲबट शैक्षणिक संकुलाने राबविलेले संपूर्ण विद्यालय स्वच्छता अभियान कौतुकास्पद असून, असे अभियान दररोज राबवून शाळेचा परिसर नेहमीच स्वच्छ ठेवावा, अशी अपेक्षा , उद्योजक तथा स्कूल कमिटीचे सदस्य (प्राथमिक विभाग) सदस्य इंजि. विजय बेरड यांनी व्यक्त केली.

श्रीमती ॲबट मायादेवी गुरुदत्ताशाह हायस्कूल व विश्वशंकर प्राथमिक विद्यालय, भिंगार यांच्या संयुक्त विद्यमाने शासनाच्या आदेशानुसार संपूर्ण विद्यालय स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या उपक्रमांतर्गत विद्यालयाचा संपूर्ण परिसर, मैदान आणि शालेय इमारतीची स्वच्छता करण्यात आली. सुमारे तीन एकर परिसरात विस्तारलेल्या या विद्यालयातील प्रत्येक भाग स्वच्छ करण्यासाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. सर्वांनी एकत्रितपणे श्रमदान करून शाळेचा परिसर स्वच्छ व चकाचक केला.

या उपक्रमाचे कौतुक करताना विजय बेरड म्हणाले की, प्रत्येक भारतीयाला आपले घर स्वच्छ असावे, असे वाटते. मात्र, घराबरोबरच शाळा, रस्ते आणि इतर सार्वजनिक ठिकाणांच्या स्वच्छतेची जबाबदारीही प्रत्येकाने स्वीकारली पाहिजे. शाळेतील स्वच्छता ही विद्यार्थ्यांना चांगल्या सवयी लावणारी आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देणारी प्रक्रिया आहे. विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचे महत्त्व समजून घेत ते आपल्या दैनंदिन जीवनात आचरणात आणावे. शाळा केवळ स्वच्छता अभियानाच्या दिवशीच नव्हे, तर दररोज स्वच्छ दिसली पाहिजे, असेही त्यांनी नमूद केले.

या अभियानामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन केलेल्या श्रमदानातून सार्वजनिक स्वच्छतेचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले. सार्वजनिक परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेण्याचे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे प्राचार्य प्रमोद तोरणे यांनी केले. यावेळी माजी रयत सेवक पाराजी भांड आणि सामाजिक कार्यकर्ते इंजि.विजय बेरड यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अस्वर संदीप यांनी केले, तर प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक नारायण अनभुले यांनी आभार मानले.

### बांधकाम कामगार संघटनाच्या वतीने २६ ऑक्टोबर पासून

# अकोले ते मुंबई बांधकाम कामगारांचा लॉग मार्च

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बांधकाम कामगार मंडळाकडून नोदणीकृत बांधकाम कामगारांना मिळणारे अर्थसहाय्य आणि कल्याणकारी योजनांचे लाभ बंद झाल्याने कामगारांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे बंद केलेले सर्व लाभ पुन्हा सुरु करावेत यासह विविध मागण्यासाठी कामगार नेते डॉ. अजित नवले यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी (दि. २६) अकोले ते मुंबई असा चारचाकी वाहनांचा मोर्चा काढण्यात येणार आहे.या मोचो मध्ये सामील होण्याचे संघटनेचे कार्याध्यक्ष अविनाश घुले यांनी सांगितले आहे.

दुष्काळी परिस्थितीमध्ये या बांधकाम कामगार मजुरांना पाण्या अभावी काम मिळणे मुश्किल झाले आहे. या परिस्थितीत शासनाने कामगारांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्या ऐवजी चालू असलेल्या सर्व आर्थिक लाभाच्या योजना बंद ठेवल्या आहेत, शासनाने बंद केलेल्या सर्व आर्थिक लाभाच्या योजना पुन्हा सुरु कराव्यात. त्याचबरोबर संघटनेने मागील आंदोलनातून मिळविलेली आरोग्य विमा योजना पुन्हा सुरू करावी या प्रमुख मागण्या बरोबरच दुष्काळी परिस्थितीत वीस हजार रुपये दिवाळी भेट कामगारांना मिळावी तसेच घरकुलासाठी पाच लाख रुपये अनुदान व ६० वर्षानंतर विनाअट ५००० प्रतिमाह निवृत्ती वेतन देण्यात यावे, त्याचबरोबर शिक्षणासाठी देण्यात येणारे अर्थसहाय्य पूर्वीप्रमाणेच चालू ठेवावे, अशा विविध स्वरूपातील मागण्यांची पूर्तता करण्यासाठी अकोले ते मुंबई व्हेहीकल मार्च (वाहन मोर्चा) मध्ये आमची संघटना सामील होणार असून बांधकाम कामगारांनी आपल्या न्याय हक्क मागणीसाठी मोठ्या संख्येने सामील होण्याचे आवाहन संघटनेचे सरचिटणीस नंदू डहाणे व अध्यक्ष कॉ बाबा आरगडे यांनी केले आहे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### होमिओ हेल्थ केअर येथे मोफत मूळव्याध तपासणी शिबिराचे आयोजन



अहिल्यानगर - चुकीचा आहार विहार, दिनचर्या यामुळे मूळव्याधाचे प्रमाण वाढले आहे. होमिओपॅथिक उपचार पद्धतीने मूळव्याधीवर प्रभावी उपचार शक्य आहे. रूग्णांना या उपचार पद्धतीचा लाभ व्हावा यासाठी नगर शहरातील महाजन गल्ली येथील होमिओ हेल्थ केअर येथे मोफत मूळव्याध तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २४ ते २८ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत सकाळी १० ते २ आणि सायंकाळी ६ ते ९ यावेळेत सदर शिबिर होत आहे, अशी माहिती होमिओपॅथी तज्ज्ञ डॉ. रोहित गुगळे व डॉ. सपना गुगळे यांनी दिली.पोट साफ न होणे, शौचाच्या वेळी रक्त पडणे, शौच करताना आग होणे, तीव्र वेदना होणे, शौचाच्या जागी बेंड निर्माण होऊन पू येणे, रक्तस्राव होणे, शौचाच्या जागेवर हाताला गाठ लागणे, शौचाच्या जागेवर खाज येणे अशी लक्षणे असलेल्या रूग्णांना या शिबिरातील उपचारांचा मोठा लाभ होईल. शिबिरात होमिओपॅथी औषधे नाममात्र १०० रूपयात दिली जातील. होमिओपॅथिक उपचार पद्धती अतिशय प्रभावशाली असून साईड इफेक्ट होत नाहीत. जास्तीत जास्त रूग्णांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ. गुगळे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क: ९८२३५६३६४३.

### प्रियदर्शनी ज्युनियर कॉलेजच्या विद्यार्थ्यांची विभागीय स्पर्धेकरीता निवड




अहिल्यानगर - क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा आधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद, सोलापूर यांचे संयुक्त विद्यमाने विभागीयस्तरीय शालेय ज्युदो स्पर्धेमध्ये भिंगार येथील प्रियदर्शनी पब्लिक स्कूल अ‍ॅण्ड ज्युनियर कॉलेज इ. ११वी सायन्सचा विद्यार्थी शौर्य राहुल लष्करे याने द्वितीय क्रमांक पटकावला, तसेच क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा आधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद, अहिल्यानगर यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित कराटे स्पर्धेत इ. १२वी सायन्स चा विद्यार्थी रूद्रप्रताप गणेश मुळे याने प्रथम क्रमांक मिळवला असून, त्याची शालेय विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. नेत्रदिपक यश मिळविलेल्या दोन्ही विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शन करणारे क्रीडा प्रशिक्षक यांचे संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब खोमणे, प्राचार्या श्रीमती अंजली बोधक आणि संस्थेचे व शाळेचे पदाधिकारी यांनी अभिनंदन केले आणि यशस्वी विद्यार्थ्यांना भविष्यकालीन स्पर्धेकरीता शुभेच्छा दिल्या.

# प्लास्टिकमुक्तीचा नारा देत विद्यार्थ्यांनी साकारले रंगीबेरंगी आकाशकंदील!

**लक्ष्मीबाई भाऊराव पाटील विद्यालयाचा पर्यावरणपूरक उपक्रम । चायनीज कंदिलांना फाटा; विद्यार्थ्यांचा स्वनिर्मित, पर्यावरणपूरक दिवाळीचा संकल्प । टाकाऊ वस्तूंपासून आकर्षक कंदील निर्मिती; पणत्या सजवून विद्यार्थ्यांनी जपली सर्जनशीलता**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** दिवाळी म्हणजे प्रकाश, आनंद, उत्साह आणि मांगल्याचा सण. मात्र, या सणाच्या निमित्ताने प्लास्टिकचा वाढता वापर, चायनीज वस्तूंचे आकर्षण आणि फटाक्यांमुळे होणारे वायू व ध्वनिप्रदूषण यांचा पर्यावरणावर विपरीत परिणाम होत आहे. या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धन, स्वदेशी वस्तूंचा वापर आणि सर्जनशीलतेचा संदेश देण्यासाठी शहरातील कापड बाजार परिसरातील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक व माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी अनोखा उपक्रम राबविला. 'प्लास्टिक व फटाकेमुक्त दिवाळी, स्वदेशी वस्तूंची दिवाळी!' असा नारा देत विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हातांनी आकर्षक, रंगीबेरंगी आणि पर्यावरणपूरक आकाशकंदील तयार केले. तसेच विविध रंग, मोती, खडे आणि चमकीच्या साहाय्याने पणत्या सजवून यंदाची दिवाळी स्वनिर्मित वस्तूंनी साजरी करण्याचा संकल्प केला.

शाळेच्या कार्यानुभव कार्यशाळेअंतर्गत जीवनकौशल्य विकासाचा भाग म्हणून 'आकाशकंदील बनवा आणि पणती सजवा' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता प्रत्यक्ष कृतीतून नवीन कौशल्ये शिकता यावीत, स्वतःच्या कल्पनांना कलात्मक रूप देता यावे आणि पर्यावरणाबाबत जबाबदारीची जाणीव निर्माण व्हावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता.

कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तू, रंगीत क्राफ्ट पेपर, कागद, दोरे आणि गोंद यांचा वापर करून विविध आकारांचे आणि आकर्षक डिझाइनचे आकाशकंदील तयार केले. रंगसंगती, कागदांची



कलात्मक मांडणी, सजावटीच्या वस्तूंचा कल्पक वापर आणि नावीन्यपूर्ण रचना यांमुळे विद्यार्थ्यांनी साकारलेले आकाशकंदील लक्षवेधी ठरले. स्वतःच्या हातांनी वस्तू तयार करण्याचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता.

आकाशकंदील तयार करण्याबरोबरच विद्यार्थ्यांनी पणत्या सजविण्याच्या उपक्रमातही उत्स्फूर्त सहभाग घेतला. साध्या पणत्यांना रंग, मोती, खडे आणि चमकीच्या साहाय्याने आकर्षक रूप देण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेनुसार केलेली सजावट सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना, कल्पनाशक्तीला आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन मिळाले. दिवाळीच्या काळात बाजारपेठेत उपलब्ध असलेल्या चायनीज सजावटीच्या वस्तूंच्या तुलनेत भारतीय बनावटीच्या आणि स्वतः तयार केलेल्या वस्तूंचा वापर वाढावा, हा संदेश विद्यार्थ्यांनी या उपक्रमातून दिला. चायनीज आकाशकंदिलांऐवजी आपल्या हातांनी बनवलेले स्वदेशी कंदील वापरण्याचा निर्धार विद्यार्थ्यांनी व्यक्त केला. स्वदेशी उत्पादनांचा सन्मान करणे, स्थानिक वस्तूंना प्राधान्य देणे आणि पर्यावरणाला हानी पोहोचविणाऱ्या वस्तूंचा वापर टाळणे, याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यात आली.

प्लास्टिकचा अनावश्यक वापर टाळणे, पुनर्वापर करता येणाऱ्या वस्तूंचा उपयोग करणे आणि फटाक्यांमुळे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी प्रयत्न करणे, यांचे महत्त्वही विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले.

या उपक्रमाला प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका लक्ष्मी आहेर यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना वाव मिळावा, त्यांच्यातील सर्जनशीलता विकसित व्हावी आणि त्यांनी स्वतः तयार केलेल्या वस्तूंचा उपयोग करून दिवाळी साजरी करण्याचा आनंद अनुभवावा, या उद्देशाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. प्लास्टिकमुक्त दिवाळीच्या दिशेने हा छोटा; परंतु महत्त्वपूर्ण प्रयत्न असल्याचे नमूद करत विद्यार्थ्यांनी कागदी आकाशकंदील आणि सजविलेल्या पणत्यांच्या माध्यमातून स्वदेशीचा गौरव व पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक महादेव भद्रे यांनीही या उपक्रमाचे कौतुक केले. दिवाळीचा खरा अर्थ केवळ दिवे लावणे किंवा रोषणाई करणे एवढाच मर्यादित नसून, मनातील अंधार दूर करणे आणि समाजात पर्यावरणपूरक बदल घडविणे हाही आहे, असे त्यांनी सांगितले.

प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम उत्साहात पार पडला. यावेळी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक महादेव भद्रे, प्राथमिक विभागाच्या शिक्षिका मीनाक्षी खोडदे, उर्मिला साळुंके, सुजाता दोमल, सोनाली अनभूले, रूपाली वाबळे, कांचन मदने, भारती सुसरे, भाग्यश्री लोंढे, कविता हिरणवाळे, इंदुमती दरेकर, पूनम धाडगे, रूपाली पांडुळे, सौ. जगताप आणि बिडवे मावशी उपस्थित होते. यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी आकाशकंदील आणि पणत्या तयार करण्याचे प्रकल्प प्रमुख स्मिता पिसाळ व स्वाती गारुडकर यांच्या मार्गदर्शनाखाली काम पूर्ण केले. यावेळी माध्यमिक विभागाचे शिक्षक प्रदीप पालवे, सुषमा गंभीरे, मंगेश कारखिले, उमेश विलायते, राजेंद्र देवकर, ज्योती उबाळे, अमृता थोरात, मृणालिनी शिंदे आणि राजेंद्र गुंजकर उपस्थित होते.

# विटभट्टी व्यवसायाला आर्थिक संकटाचा फटका; पदवीधरही उतरले व्यवसायात!

**पावसाच्या अनिश्चिततेमुळे विटांची मागणी मंदावली; कर्ज, मजुरांची उचल आणि वाढत्या खर्चामुळे विटभट्टी मालकांची कसरत**

**दैनिक आकर्षण । हारून शेख**

**पैठण –** दसऱ्यानंतर विटभट्ट्यांचा हंगाम सुरू होतो. मात्र, बदलती निसर्गस्थिती, यंदा अपेक्षेप्रमाणे न झालेला पाऊस आणि बांधकाम क्षेत्रातील मंदावलेली मागणी यामुळे विटभट्टी व्यवसायासमोर आर्थिक संकट उभे ठाकले आहे. अनेक विटभट्टी मालकांनी मोठ्या कष्टाने तयार केलेल्या विटा विक्रीअभावी पडून असल्याने त्यांची आर्थिक कोंडी झाली आहे. आगामी हंगामाच्या तयारीसाठी भांडवल उभे करताना मालकांना अक्षरशः तारेवरची कसरत करावी लागत आहे. विटभट्टी व्यवसाय सुरू करण्यासाठी सुरुवातीपासूनच मोठ्या प्रमाणावर भांडवलाची गरज असते. मजुरांना आगाऊ रक्कम देणे, विटा तयार करण्यासाठी लागणारी माती व अन्य साहित्य खरेदी करणे, जागामालक शेतकऱ्यांना पैसे देणे, तसेच माती वाहतूक करणाऱ्यांचा खर्च भागवणे, अशा अनेक जबाबदाऱ्या मालकांवर असतात. त्यातच विटभट्टी सुरू करण्यासाठी आवश्यक रॉयल्टी प्रक्रियेसाठी तहसील कार्यालयाच्या चकरा माराव्या लागत असल्याने वेळ आणि पैसाही खर्च होतो.

**कुणाचे सोने गहाण, तर कुणाचे सावकाराकडून कर्ज**

हंगाम सुरू होण्यापूर्वी मजुरांची व्यवस्था करणे हे विटभट्टी मालकांसमोरील मोठे आव्हान आहे. मजुरांना आगाऊ रक्कम



दिल्याशिवाय कामगार मिळणे कठीण होत असल्याने काही मालकांनी घरातील महिलांचे सोन्याचे दागिने गहाण ठेवून पैसे उभे केले आहेत, तर काहींनी खासगी सावकारांकडून व्याजाने कर्ज घेतले आहे. मात्र, तयार केलेल्या विटांना ग्राहक मिळत नसल्याने घेतलेले कर्ज फेडायचे कसे, असा प्रश्न त्यांच्यासमोर निर्माण झाला आहे.

**मजुरांच्या पलायनामुळेही आर्थिक फटका**

आगाऊ रक्कम देऊन कामावर आणलेले काही मजूर हंगामाच्या मध्यातच काम सोडून निघून जातात. त्यांना दिलेली उचल परत मिळत नाही. पुढील वर्षी नियमित कामावर येण्याचे आश्वासन देऊनही अनेक मजूर पुन्हा येत नसल्याने मालकांचे आर्थिक नुकसान होते. नव्याने मजूर शोधणे, त्यांना उचल देणे आणि उत्पादन सुरू ठेवणे, या प्रक्रियेत अतिरिक्त खर्च वाढत जातो.

**पावसाने साथ दिली तरच व्यवसायाला आधार**

विटभट्टी व्यवसायात निसर्गाची साथ अत्यंत महत्त्वाची असते. उत्पादन तयार झाल्यानंतर हंगामात पाऊस पडल्यास विटांचे नुकसान होण्याची भीती असते. दुसरीकडे, पावसाची स्थिती आणि बांधकाम क्षेत्रातील मागणी यांचा थेट परिणाम विटांच्या विक्रीवर होतो. विटा तयार करूनही त्या वेळेत विकल्या गेल्या नाहीत, तर भांडवल अडकून पडते. त्यात कर्जाचे व्याज आणि गहाण ठेवलेल्या सोन्यावरील व्याज वाढत असल्याने मालकांची आर्थिक चिंता अधिकच वाढते.

**पदवीधर तरुणही विटभट्टी व्यवसायात**

नोकरीच्या मर्यादित संधी आणि वाढती बेरोजगारी यामुळे अनेक सुशिक्षित, पदवीधर तरुण विटभट्टी व्यवसायात आपले नशीब आजमावत आहेत. स्वतःचा व्यवसाय उभा करून कुटुंबाला आर्थिक आधार देण्याच्या उद्देशाने ते या क्षेत्रात उतरले आहेत. मात्र, वाढता उत्पादन खर्च, मजुरांची अनिश्चितता, बाजारपेठेतील मंदी आणि निसर्गावर अवलंबून असलेला व्यवसाय यामुळे त्यांच्यासमोरही मोठी आव्हाने उभी आहेत. एकीकडे रोजगारनिर्मिती आणि बांधकाम क्षेत्रासाठी आवश्यक असलेल्या विटांचे उत्पादन, तर दुसरीकडे वाढते कर्ज आणि अनिश्चित बाजारपेठ, अशा दुहेरी संकटात विटभट्टी मालक सापडले आहेत. तयार विटांना योग्य दरात ग्राहक मिळणे आणि व्यवसायासाठी घेतलेल्या कर्जातून बाहेर पडणे, हीच सध्या विटभट्टी मालकांची प्रमुख अपेक्षा आहे.

**श्री ढोकेश्वर विद्यालयात**

# 'पर्यावरण पूरक आकाश कंदिल बनवा' कार्यशाळा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** श्री ढोकेश्वर विद्यालयात विद्यार्थांसाठी इको फ्रेंडली आकाश कंदिल तवार करण्याची अनोखी कार्यशाळा पार पडली आपल्या हाताने आपल्याला हवा तसा आकाशकंदिल बनवून अभिमानाने तो घराच्या दारावर टांगण्यात एक वेगळाच आनंद असतो. भारतीय संस्कृतीतील पवित्र मानल्या जाणाऱ्या दिवाळी या सणानिमित्त विद्यर्थ्यांमध्ये उपजत असणारे सुप्तगुण विकसित व्हावेत, त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास व्हावा, या हेतूने इको फ्रेंडली आकाश कंदिल बनवण्याच्या कार्यशाळेचे आयोजन केले होते. कलाशिक्षक तथा चित्रकार नारायण शेळके यांनी इको फेंडली आकाश कंदिल तयार करण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवले व याचे महत्व समजावून सांगितले., विद्यार्थ्यांनी इको फ्रेंडली वस्तूंचा वापर करून माफक खर्चामध्ये व कमी वेळेत सुंदर व आकर्षक आकाश कंदिल तयार केले. हे स्वतः तयार केलेले आकाश कंदिल विद्यार्थी आपल्या स्वतःच्या घरावर दिवाळीच्या सणासाठी लावून हा दीपोत्सव साजरा करणार आहेत. या कार्यशाळेत २१० विद्यार्थी उत्साहात सहभागी झाले होते, यावेळी विद्यार्थांमध्ये अतिशय आनंदमयी वातावरण निर्माण झाले होते. यावेळी प्राचार्य बाळासाहेब खिलारी,



पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे, चित्रकार तथा कलाशिक्षक नारायण शेळके, प्रा.अशोक गांगड, प्रा. भाऊसाहेब हिंगडे, प्रा.अतिष झावरे,प्रा.पोपळघट प्रा.महानवर,पवन कुटे, बाबासाहेब जाधव, अतुल सैद, ढोणे, प्रा.जगदाळे, प्रा.नितीन ढोकळे,निलम खिलारी,सुमन वाळुंज, वैशाली गायखे, सोनल रोहकले, महांडूळे, दिनेश वायदंडे ,विष्णु भर्द्रे, स्वप्नील कदम विश्वासराव मॅडम, प्रिया डव्हणे, सुरेखा ठाणगे, खरे,शिर्के आदी उपस्थित होते. प्लास्टिकमुक्त दिवाळी साजरी करण्याचा संदेश देत, विद्यार्थ्यांनी स्वनिर्मित कंदील बनवत आपली कल्पकता आणि कलाकौशल्याचे दर्शन घडवले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संरक्षणाची जाणीव आणि स्वावलंबनाची भावना निर्माण झाली. याप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य श्री.बाळासाहेब खिलारी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. पर्यावरणपूरक सण साजरे करणे ही काळाची गरज असून, अशा उपक्रमांमधून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो, असे मत त्यांनी व्यक्त केले.

# 'निरोगी जीवनासोबत पर्यावरण संवर्धनाची जबाबदारीही पार पाडा' - शिवाजीराव कचरे

**जिल्हा न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन । प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश शिवाजीराव कचरे यांच्या हस्ते शुभारंभ**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात धकाधकीच्या जीवनशैलीमुळे मनुष्याचे आरोग्याकडे दुर्लक्ष होत आहे. निरोगी आणि सुदृढ जीवनासाठी नियमित व्यायामाबरोबरच आपल्या आवडीच्या खेळांना वेळ देणे आवश्यक आहे. खेळांमुळे सांघिक भावना वाढीस लागते, विचारांची देवाणघेवाण होते आणि कामाचा ताण कमी होण्यास मदत मिळते. त्याचबरोबर प्रत्येकाने पर्यावरण, निसर्ग आणि वृक्षसंवर्धनाबाबत जागरूक राहून आपल्या परिसरात हरित वातावरण निर्माण करण्यासाठी योगदान द्यावे, असे प्रतिपादन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश शिवाजीराव कचरे यांनी केले.

अहमदनगर जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटना व पतसंस्थेच्या वतीने जिल्हा पोलीस परेड मैदानावर न्यायालयीन कर्मचाऱ्यांसाठी आयोजित जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश शिवाजीराव कचरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.



शिवाजीराव कचरे म्हणाले की, जिल्हा न्यायालयात मोठ्या प्रमाणावर वृक्षसंवर्धन करण्यात आले आहे. प्रत्येक कर्मचाऱ्याने पर्यावरण, निसर्ग आणि वृक्षांवर प्रेम करावे. आपण काम करीत असलेल्या टेबलचा परिसर स्वच्छ ठेवावा आणि शक्य असल्यास टेबलवर छोटेसे रोप ठेवावे. हिरवळीमुळे परिसर प्रसन्न राहतो आणि सकारात्मक ऊर्जा मिळते. पर्यावरण संवर्धन ही प्रत्येकाची जबाबदारी असून, दैनंदिन जीवनात छोटे छोटे बदल करूनही निसर्गाच्या संरक्षणासाठी योगदान देता येते.

न्यायालयीन कर्मचाऱ्यांना काम करताना अनेकदा मोठ्या ताणतणावाला सामोरे जावे लागते. अशा परिस्थितीत निरोगी जीवनासाठी व्यायाम आणि खेळ महत्त्वाचे ठरतात. आपल्या आवडीच्या खेळासाठी वेळ काढल्यास शारीरिक तंदुरुस्ती टिकविण्यासोबत मानसिक प्रसन्नताही वाढते. देशात क्रिकेटला मोठे महत्त्व प्राप्त झाले असून, हा अनेकांचा आवडता खेळ आहे. क्रिकेटसारख्या सांघिक खेळातून एकजुटीची भावना निर्माण होते आणि सहकाऱ्यांमध्ये सुसंवाद वाढतो, असेही त्यांनी सांगितले.

अहमदनगर जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटना व पतसंस्थेच्या वतीने आयोजित या स्पर्धेत जिल्हा न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या नऊ संघांनी सहभाग नोंदविला आहे. स्पर्धेतील सामने साखळी पद्धतीने खेळविण्यात येणार आहेत. उद्घाटनप्रसंगी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश शिवाजीराव कचरे यांनी स्वतः क्रिकेट खेळण्याचा आनंद घेतला. यावेळी त्यांनी खेळासोबत पर्यावरण, निसर्ग आणि वृक्षसंवर्धनाचा संदेशही दिला.

कार्यक्रमाला पोलीस निरीक्षक उमेश परदेशी, जिल्हा न्यायालयाचे प्रबंधक संदीप कडू, कौटुंबिक न्यायालयाचे प्रबंधक नितीन धोंगडे, , कौटुंबिक न्यायालयाचे अध्यक्ष ॲड. शिवाजीराव कराळे, सरकारी वकील सुरेश लगड, न्यायालयीन कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष अंकुश सांगळे, कार्याध्यक्ष शिरीष ढाळे, सचिव रवींद्र सूर्यपुजारी, पतसंस्थेच्या संचालिका अर्चना झिंजे, सचिव नरेंद्र देशमुख, सुमित दसूर, देवेंद्र शिंदे यांच्यासह न्यायालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आमचे जावई ‘भाऊ’ हरपले!

## हिवरा पिंपरखेडच्या ऋणानुबंधांना अश्रुपूर्ण निरोप



अहिल्यानगरच्या राजकारणात दबदबा निर्माण करणारे, बाजार समितीचे माजी सभापती आणि यशस्वी उद्योजक भानुदास कोतकर ऊर्फ ‘भाऊ’ यांच्या निधनाने (दि. २४) अहिल्यानगरसह बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील हिवरा पिंपरखेड गावावरही दुःखाचा डोंगर कोसळला आहे. आमच्यासाठी भाऊ केवळ मोठे नेते नव्हते, तर गावचे लाडके जावई आणि हक्काचा आधार होते.

**संघर्षातून घडलेले कर्तृत्व**

भाऊंचा जीवनप्रवास संघर्षमय होता. आमच्या गावचे ज्येष्ठ नेते स्व. मुरलीधर आबा लगड (मुकादम) नेहमी सांगायचे, ‘‘भाऊ आणि मी खूप कष्ट केले. रोजगार हमी योजनेवरही काम केले.’’ या कष्टांतून भाऊंनी हॉटेल व्यवसाय उभा केला, कुटुंबाला स्थैर्य दिले आणि भावांनाही स्वतःच्या पायावर उभे केले. पत्नी सुरेखाताईंची त्यांना मोलाची साथ लाभली. भाऊंचा स्वभाव रागीट असला, तरी अंतःकरणातून ते प्रेमळ होते. सुरेखाताईंचा शांत स्वभाव आणि मुलांवरील संस्कार यामुळे कोतकर कुटुंबाशी आमचे नाते अधिक घट्ट झाले.

**सासुरवाडीच्या माणसांचा आधार**

भाऊंनी मेहुणे शरद लगड, भारत लगड यांच्यासह हिवरा गावातील अनेकांना रोजगार, शिक्षण आणि अहिल्यानगरमध्ये घरे मिळवून देण्यासाठी मदत केली. शहरात कोणाचे काम अडले, तर भाऊ तत्परतेने मदतीला धावून येत. गावच्या यात्रेला ते संदीप, सचिन यांच्यासह कुटुंबाला घेऊन येत. गावातील सुख-दुःखात सहभागी होत आणि कुस्तीच्या आखाड्यात संदीपला प्रोत्साहन देत. त्यामुळे ग्रामस्थ अभिमानाने सांगायचे, ‘‘भाऊ आमचे जावई आहेत!’’मागील वर्षी ग्रामस्थांनी त्यांचा नागरी सत्कार केला. प्रेमाने भारावलेल्या भाऊंची ती भेटच हिवरा गावासाठी अखेरची ठरली.

**माणुसकीची श्रीमंती**

बाजार समितीला नावलौकिक मिळवून देणारे आणि शहराच्या विकासात योगदान देणारे भाऊ अनेकांच्या मदतीला धावले. त्यांनी कमावलेली माणसे आणि जपलेली नाती हाच त्यांच्या आयुष्याचा खरा ठेवा होता. भाऊंच्या निधनाने हिवरा ग्रामस्थांचा जिव्हाळ्याचा आधार हरपला आहे. सुरेखाताई, संदीप कोतकर आणि संपूर्ण कुटुंबाच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. भाऊ, तुमचे प्रेम, आधार आणि ऋणानुबंध आम्ही कधीही विसरणार नाही. तुम्हाला हिवरा ग्रामस्थांच्या वतीने **विनम्र अभिवादन आणि भावपूर्ण श्रद्धांजली!**

■ अनिल लगड,
ज्येष्ठ पत्रकार, अहिल्यानगर.
९४२२७१४६४२

# धनंजय निमसे राष्ट्रवादी काँग्रेस वाहतूक सेलच्या राज्यप्रमुखपदी

## आ. दातेंच्या उपस्थितीत प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरेंच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या संघटनात्मक विस्ताराच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेत गोवर्धन उर्फ धनंजय निमसे यांची महाराष्ट्र राज्य राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाहतूक सेलच्या राज्यप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या हस्ते आ. काशिनाथ दाते व आ. शिवाजीराव गर्जे यांचे उपस्थित निमसे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

गोवर्धन निमसे यांच्यावर राज्यस्तरीय जबाबदारी सोपविण्यात आल्याने वाहतूक क्षेत्रातील संघटनात्मक कामाला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. वाहतूक क्षेत्रातील कार्यकर्त्यांची बांधणी, त्यांच्या प्रश्नांना संघटनात्मक व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि पक्षाचे कार्य राज्यभर अधिक प्रभावीपणे पोहोचविणे, अशी महत्त्वपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर राहणार आहे.

या नियुक्तीप्रसंगी आमदार दाते सर यांची उपस्थिती विशेष लक्षवेधी ठरली. पारनेरनगर विधानसभा मतदारसंघातील संघटनात्मक कार्याला बळ देतानाच पक्षाच्या राज्यस्तरीय वाटचालीत योगदान देणाऱ्या पदाधिकाऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याची भूमिका त्यांच्या उपस्थितीतून अधोरेखित झाली. पक्षातील कार्यकर्त्यांना संधी, नेतृत्वाला प्रोत्साहन आणि संघटनात्मक बांधणीला चालना देण्याच्या दृष्टीने या नियुक्तीकडे महत्त्वपूर्ण घडामोड म्हणून पाहिले जात आहे. यावेळी विधानपरिषदेचे आमदार तथा राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस शिवाजीराव गर्जे साहेब, जिल्हा सहकारी बँकेचे संचालक प्रशांतदादा गायकवाड, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतदादा चेडे, संजयशेठ आहेर, संतोषशेठ चौगुले, अविनाशशेठ गोडसे आणि आदित्यशेठ नरड उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेसचे दिवंगत ज्येष्ठ नेते अजितदादा पवार यांच्या विचारांचा वारसा, जनसेवेची परंपरा आणि सर्वसामान्यांशी असलेली बांधिलकी पुढे नेण्याच्या उद्देशाने संघटनात्मक काम अधिक व्यापक करण्यावर पक्षाचा भर आहे. गोवर्धनशेठ निमसे यांच्या नियुक्तीमुळे वाहतूक सेलच्या कार्याला राज्यभर नवी ऊर्जा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. गोवर्धनशेठ निमसे यांचे राज्यप्रमुखपदी नियुक्तीबद्दल अभिनंदन करून आमदार काशिनाथ दाते सरांसह उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



धनंजय निमसे यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाहतूक सेलच्या राज्यप्रमुखपदी झालेली नियुक्ती ही पारनेर तालुक्यासाठी अभिमानाची आणि आनंदाची बाब आहे. पारनेर तालुक्याला प्रथमच राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्षीय पातळीवर राज्यस्तरावर काम करण्याची महत्त्वपूर्ण संधी मिळाली आहे, ही आपल्या सर्वांसाठी गौरवास्पद गोष्ट आहे. या नियुक्तीमुळे तालुक्यातील कार्यकर्त्यांना नवी प्रेरणा मिळेल आणि पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत होईल. धनंजय निमसे आपल्या अनुभवातून आणि कार्यक्षमतेतून या जबाबदारीला निश्चितच न्याय देतील, असा मला विश्वास आहे. त्यांच्या पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा..!

– आमदार काशिनाथ दाते सर
(विधानसभा सदस्य, पारनेर – नगर)

# मांडओहळ तलावातील मत्स्यव्यवसायाला चालना देणार : मंत्री नितेश राणे

## आ. दातेंनी मांडला रोजगारनिर्मितीचा आराखडा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** तालुक्यातील मच्छीमारांना रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध व्हाव्यात आणि मांडओहळ तलावासह परिसरातील लहान-मोठ्या जलाशयांच्या माध्यमातून मत्स्यव्यवसायाला चालना मिळावी, या उद्देशाने राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे विकासमंत्री ना. नितेश राणे यांनी मांडओहळ तलावाला भेट देऊन स्थानिक मच्छीमारांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी आमदार काशिनाथ दाते सर यांनी स्थानिक मच्छीमारांच्या व्यवसायाची सद्यस्थिती, आवश्यक सोयी-सुविधा आणि मत्स्यव्यवसायातून निर्माण होऊ शकणाऱ्या रोजगाराच्या संधी यांचा सविस्तर आढावा मंत्र्यांसमोर मांडला.

या भेटीदरम्यान मंत्री नितेश राणे यांनी मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती स्थानिक मच्छीमार व नागरिकांना दिली. शासनाच्या योजनांचा योग्य लाभ घेतल्यास मत्स्यव्यवसायात प्रगती साधता येऊ शकते, तसेच स्थानिक स्तरावर रोजगारनिर्मितीला चालना मिळू शकते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आगामी काळात मांडओहळ तलावासह परिसरातील जलाशयांमध्ये मत्स्यव्यवसायाच्या विकासासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत सहकार्य करण्याची ग्वाहीही त्यांनी दिली.

आमदार काशिनाथ दाते सर यांनी मच्छीमारांना भेडसावणाऱ्या अडचणी, व्यवसायासाठी आवश्यक पायाभूत सुविधा आणि मत्स्योत्पादन वाढविण्याच्या संभाव्य संधी यांची माहिती दिली. योग्य नियोजन, मत्स्यबीजाची उपलब्धता, आवश्यक तांत्रिक सुविधा आणि शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास मच्छीमारांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होईल. त्याचबरोबर युवकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होऊन परिसराच्या आर्थिक विकासालाही चालना मिळेल, असे त्यांनी अधोरेखित केले.

मत्स्यव्यवसाय विभागामार्फत प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजना आणि मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना यांसारख्या योजनांच्या माध्यमातून मत्स्यव्यवसायाच्या विकासासाठी विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. मत्स्यबीज उत्पादन, मत्स्यसंवर्धन, आवश्यक पायाभूत सुविधा, प्रशिक्षण आणि पात्र लाभार्थ्यांसाठी अर्थसहाय्य यांसारख्या घटकांचा योजनांमध्ये समावेश असू शकतो. मांडओहळ तलाव आणि परिसरातील जलाशयांसाठी पाण्याची उपलब्धता, तांत्रिक निकष व शासनाच्या नियमांनुसार योग्य योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे महत्त्वाचे ठरणार आहे.

मांडओहळ तलाव आणि परिसरातील जलाशयांमध्ये मत्स्यव्यवसायाच्या संधी विकसित झाल्यास स्थानिक मच्छीमारांच्या उपजीविकेला भक्कम आधार मिळू शकतो. पारंपरिक व्यवसायाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड, शास्त्रीय मत्स्यसंवर्धन आणि बाजारपेठेपर्यंत पोहोच मिळाल्यास या क्षेत्रात शाश्वत रोजगारनिर्मितीची दारे खुली होऊ शकतात. या दृष्टीने शासन, प्रशासन आणि स्थानिक मच्छीमार यांच्यात समन्वय राखून पुढील कार्यवाही करण्याची आवश्यकता या भेटीतून अधोरेखित झाली. यावेळी आमदार काशिनाथ दाते सर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, जिल्हा सहकारी बँकेचे माजी संचालक प्रशांत गायकवाड, मा. जिल्हा परिषद सदस्य वसंत चेडे, तहसीलदार गायत्री सौंदाणे, उद्योजक दिलीप दाते, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, राष्ट्रवादीच्या महिला जिल्हा उपाध्यक्षा सोनाबाई चौधरी, महिला तालुकाध्यक्षा सुषमा रावडे, युवती तालुकाध्यक्षा अपर्णा खामकर, सोनाली कुलथे, जयश्री शिंदे, नीलम गोसावी, राष्ट्रवादीचे शहर कार्याध्यक्ष पंढरीनाथ उंडे, टाकळी ढोकेश्वर गटाचे नेते देवराम मगर, ज्येष्ठ नागरिक संघाचे तालुकाध्यक्ष अरुण राजदेव, सामाजिक न्याय विभागाचे तालुकाध्यक्ष अशोक खैरे, सहकार सेलचे तालुकाध्यक्ष बबनराव पायमोडे, दिव्यांग सेलचे तालुकाध्यक्ष रवींद्र आहेर, संतोष शेलार, राजेंद्र उबाळे यांच्यासह स्थानिक मच्छीमार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मांडओहळ तलावातील मत्स्यव्यवसायाला मोठी संधी असून, त्यातून स्थानिक मच्छीमारांना रोजगार आणि आर्थिक स्थैर्य मिळू शकते. मत्स्यव्यवसाय मंत्री ना. नितेश राणे यांनी मच्छीमारांच्या प्रश्नांची सकारात्मक दखल घेऊन सहकार्याची भूमिका घेतली, ही समाधानाची बाब आहे. मत्स्यव्यवसायाला चालना देण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ स्थानिक मच्छीमारांपर्यंत पोहोचावा, यासाठी सातत्याने पाठपुरावा करू.

आमदार काशिनाथ दाते सर
(सदस्य पारनेर नगर विधानसभा)

# विमा कंपनीने तक्रारदारास नुकसानभरपाई देण्याचे आदेश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** येथील जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग यांच्याकडे प्राप्त झालेल्या विमा कंपनीविरूद्धच्या तक्रारीमध्ये विमा कंपनीने तक्रारदारास नुकसानभरपाई देण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

याबाबत माहिती अशी : श्री. पांडुरंग मधुकर गायकवाड व यश पांडुरंग गायकवाड (रा. रिद्धीसिद्धी कॉलनी, गुलमोहोर रोड, सावेडी, नगर) यांनी आपणांस हॉस्पिटल खर्चापोटी विमा कंपनीकडे इन्शुरन्स असतानाही पूर्ण रक्कम न दिल्याच्या कारणावरून स्टार हेल्थ ॲण्ड अलाईड इन्शुरन्स कंपनीविरूद्ध ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे तक्रार दाखल केली होती.

तक्रारीमध्ये अर्जदार गायकवाड यांनी म्हटले आहे की, आपण २०१५ पासून स्टार हेल्थ ॲण्ड अलाईड इन्शुरन्स कंपनीचे नियमीत विमाधारक आहोत. दरवर्षी विमा हप्ता नियमीत भरत आहोत. यातून आपल्या कुटुंबियातील सदस्यांना विमा संरक्षण मिळावे, हा हेतू होता. परंतु, यश गायकवाड या आपल्या चिरंजीवाच्या उपचारासाठी हॉस्पिटल, तपासण्या, चाचण्या व औषधे याकरिता एकूण ५०,९१३/- खर्च झाला. मात्र विमा कंपनीने ही रक्कम मंजूर केली नाही. यातील २८,०३१/- मंजूर केले. उर्वरित २२,८८२/- रुपये नामंजूर केले. श्री. पांडुरंग गायकवाड यांनी प्रत्यक्ष झालेला खर्च मिळण्याची मागणी इन्शुरन्स कंपनीकडे केली व तशी खर्चाची मूळ कागदपत्रे, बिले व उपचारसंबंधीची कागदपत्रे जमा केली. कंपनीने मात्र हे मान्य केले नाही. त्यामुळे श्री. गायकवाड यांनी वरील तक्रार ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे दाखल केली.

ग्राहक तक्रार निवारण आयोगाने सर्व बाबींची शहानिशा करून विमा कंपनीची बाजू चुकीची असल्याची नोंद घेतली. तक्रारदार पांडुरंग गायकवाड यांना राहिलेले २२,८८२/- रुपये देण्याचा आदेश दिला. सादिकअली बी. सय्यद, श्रीमती चारु विनोद डोंगरे व श्रीमती संध्या श्रीपती कसबे यांच्या न्यायासनासमोर हा खटला चालला. तक्रारदार पांडुरंग गायकवाड यांच्यावतीने ॲड. सचिन चांगदेव इथापे व रणजीत पांडुरंग ताकटे यांनी काम पाहिले. कंपनीतर्फे ॲड. अश्विन एम. फडणीस यांनी काम पाहिले.

# मराठवाडा पदवीधर मतदारसंघात पैठणमध्ये ६३.३१ टक्के मतदान

## १७ केंद्रांवर मतदान प्रक्रिया शांततेत; ३ हजार ७८२ मतदारांचा सहभाग

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी पैठण विधानसभा क्षेत्रातील १७ मतदान केंद्रांवर ६३.३१ टक्के मतदान झाले. शुक्रवारी सकाळी ८ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत झालेल्या मतदान प्रक्रियेत एकूण ५ हजार ९७५ मतदारांपैकी ३ हजार ७८२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. संपूर्ण मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली.

पैठण विधानसभा क्षेत्रात पुरुष मतदारांची संख्या अधिक होती. मतदान केलेल्या मतदारांमध्ये ३ हजार १५४ पुरुष, तर ६२८ महिला मतदारांचा समावेश आहे. पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी पैठण शहरात पाच, तर बिडकीन येथे दोन मतदान केंद्रे उभारण्यात आली होती. याशिवाय बालानगर, पाचोड, आडूळ, लोहगाव, निलजगाव, ढोरकीन, नांदर, आपेगाव आणि पिंपळवाडी पिराची येथे मतदानाची व्यवस्था करण्यात आली होती.




**कडेकोट पोलीस बंदोबस्त**

मतदान प्रक्रिया शांततेत व सुरळीत पार पडावी, यासाठी प्रशासनाकडून आवश्यक नियोजन करण्यात आले होते. निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार ज्योती पवार यांच्या मार्गदर्शनाखाली मतदान प्रक्रिया पार पडली. पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांच्या नेतृत्वाखाली पैठण शहरासह ग्रामीण भागातील मतदान केंद्रांवर कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. बिडकीनचे पोलीस निरीक्षक निलेश शेलके, पैठण एमआयडीसीचे सहायक पोलीस निरीक्षक भरत मोरे आणि पाचोडचे पोलीस निरीक्षक सचिन पंडित यांच्यासह पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी बंदोबस्ताची जबाबदारी सांभाळली. एकूणच, पैठण विधानसभा क्षेत्रातील मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली.

# एका फाईलने तीन बँक खाती केली रिकामी

## सेवानिवृत्त रेल्वे कर्मचाऱ्याला सायबर भामट्यांचा गंडा । १ लाख ९६ हजार २०० रुपये लंपास

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** केडगाव येथील भूषणनगर परिसरात राहणाऱ्या ६९ वर्षीय सेवानिवृत्त रेल्वे कर्मचाऱ्याची संशयास्पद एपीके फाईलच्या माध्यमातून सायबर भामट्यांनी एक लाख ९६ हजार २०० रुपयांची फसवणूक केली. मोबाईलवर पाठविलेली फाईल डाऊनलोड झाल्यानंतर त्यांच्या, पत्नीच्या आणि मुलाच्या बँक खात्यांतून परस्पर पैसे काढण्यात आले. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अरुण उदेसिंग पाटील (रा. भूषणनगर, केडगाव, अहिल्यानगर) यांनी २३ ऑक्टोबर रोजी पोलिसांत फिर्याद दिली. पाटील हे २०१७ मध्ये रेल्वे विभागातून स्टेशन प्रबंधक कार्यालयातील कर्मचारी पदावरून सेवानिवृत्त झाले आहेत. पेन्शनच्या उत्पन्नावर त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. १८ ऑक्टोबर रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास त्यांच्या रेडमी १२ प्रो मोबाईलवर एका अनोळखी क्रमांकावरून ‘_.’ नावाची फाईल आली. ही फाईल मोबाईलमध्ये डाऊनलोड झाल्यानंतर त्यांच्या नकळत गुगल पेच्या माध्यमातून आर्थिक व्यवहार झाले.या व्यवहारांमध्ये पाटील यांच्या पत्नीच्या बँक ऑफ बडोदा खात्यातून ७५ हजार रुपये, तर मुलाच्या स्टेट बँक ऑफ इंडिया खात्यातून २६ हजार २०० रुपये डेबिट झाल्याचे संदेश प्राप्त झाले. त्यानंतर त्यांनी तातडीने १९३० या सायबर हेल्पलाईन क्रमांकावर तक्रार नोंदवली. तपासादरम्यान ही रक्कम कॅनरा बँकेतील एका खात्यात जमा झाल्याचे समोर आले.




दरम्यान, १९ ऑक्टोबर रोजी सकाळी पाटील यांच्या युको बँकेतील खात्यातून आणखी ९५ हजार रुपये परस्पर काढण्यात आले. ही रक्कम दुसऱ्या बँक खात्यात वळविण्यात आल्याचे समजले. अनोळखी व्यक्तीने पाठविलेली एपीके फाईल मोबाईलमध्ये डाऊनलोड झाल्यानंतर तिन्ही खात्यांतून एकूण एक लाख ९६ हजार २०० रुपयांची फसवणूक झाल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी पाटील यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ३१८ (४) नुसार अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास महिला पोलीस अंमलदार तारडे करत आहेत.